**प्राधान्य/अतितात्काळ**

**क्र.पोमसं/१/५१/वैद्यकीय चाचणी-२०१७/१४५/२०१५,**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई -४०० ००१.
दिनांक २७ / ०२ /२०१८.

**विषय :- अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ प्रमाणे भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांनी सन २०१७-१८ साठी करुन घ्यावयाची वैद्यकीय चाचण्या.**

***

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, अखिल भारतीय सेवा (कार्यमूल्यांकन अहवाल) नियम, २००७ प्रमाणे भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी सन २०१७-१८ या वर्षी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय चाचण्यांबाबतचा शासन निर्णय, गृह विभाग, क्र.आयपीएस्-३०१८/ प्र.क्र.७४/पोल-१, दिनांक १ फेब्रुवारी, २०१८, महाराष्ट्र पोलीस दलाच्या **www.mahapolice.gov.in** ह्या संकेत स्थळावर प्रस्तृत करण्यात आला आहे. तसेच, सदरचा शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर (संगणक संकेताक २०१८०१३११२४१२९६४२९) उपलब्ध आहे.

२. तरी सर्व भापोसे अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, वरील नमूद शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन त्यांनी आवश्यक ती **वैद्यकीय तपासणी विहीत कालमर्यादेतच पूर्ण करुन** तसे ह्या कार्यालयास त्वरीत (कार्यासन क्रमांक-१ ला लक्षवेध करुन) कळवावे.

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांचेकरिता.

**प्रति,**

**सर्व भापोसे अधिकारी**

**प्रत :-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई.

२/- उपरोक्त शासन निर्णय पोलीस दलाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावा. (31-03-2018 पर्यन्त)

**प्रत :-**

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.-३२
(आवश्यक त्या कार्यवाहीकरिता.)

**अ.भा.से.(कार्य मुल्यांकन अहवाल) नियम, २००७ प्रमाणे भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी <u>सन २०१७-१८ साठी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय चाचण्या.</u>**

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग,

शासन निर्णय, क्रमांक- आयपीएस-३०१८/प्र.क्र.७४/पोल-१,

मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२

दिनांक:-१ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. भाप्रसे-२०१७/प्र.क्र.२३७/२०१७/९, दिनांक १९.१२.२०१७

प्रस्तावना:-

अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम, २००७ हे नियम भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांसाठी, सन २००८-०९ या वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत. या नियमांतील नियम ३ व त्यासोबतच्या नियम ४ अनुसार, तसेच, गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्र. १७०११/३/२००३-आयपीएस-II, दिनांक २१.११.२००८ नुसार राज्यातील सर्व भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या, ठरवून दिलेल्या नमुन्यात, प्रतिवर्षी करुन घेणे बंधनकारक असून, त्यांच्या वैद्यकीय तपासणीच्या अहवालाचा सारांश, वार्षिक कार्यमुल्यांकन अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे. यानुसार महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या सन २०१७-१८ मधील वैद्यकीय तपासण्या करुन घेणे प्रस्तावित आहे. महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या सन २०१७-१८ मधील वैद्यकीय तपासण्या करण्यासंबंधी शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील नियम क्र. ३ व त्या सोबतचा नमुना ४ अनुसार, तसेच, गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्र. १७०११/3/२००3-आयपीएस II, दिनांक २१.११.२००८ नुसार राज्यातील सर्व भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या ठरवून दिलेल्या नमुन्यात, सन २०१७-१८ या वर्षी सोबतच्या प्रपत्र "अ" प्रमाणे महसूल विभागनिहाय निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयातून करुन घ्यावी. सदर वैद्यकीय तपासणी करतांना खालील सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१. महाराष्ट्र राज्य संवर्गात कार्यरत सर्व भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी तसेच केंद्रीय प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांनी ते कार्यरत असलेल्या महसुली विभागातील प्रपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या खाजगी रुग्णालयातून/ वैद्यकीय संस्थांमधून, प्रपत्र "ब"मध्ये नमुद केलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या सन २०१७-१८ या वर्षी करुन घ्याव्यात.

२. अमरावती महसूल विभागात कार्यरत असलेल्या भापोसे अधिकाऱ्यांनी त्यांना जवळ असणाऱ्या इतर महसूली विभागासाठी निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयातून सदर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी. तसेच, नागपूर विभागासाठी, विभागीय आयुक्त, नागपूर यांना रु. ५,४००/- रकमेच्या मर्यादत विहित वैद्यकीय तपासण्यांकरीता रुग्णालयांची निवड करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. नागपूर महसूल विभागात कार्यरत असलेल्या भापोसे अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त, नागपूर यांनी निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयांतून सदर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी किंवा खालील मुद्दा क्र.१२ येथील नमूद केल्यानुसार अन्य महसूल विभागातील प्राधिकृत रुग्णालयातून वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी.

३. प्रपत्र-ब मध्ये विहित केलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या करण्याची सुविधा उपलब्ध असलेल्या संबंधित जिल्ह्यातील शासकीय रुग्णालये अथवा महसूली विभागातील शासकीय / महानगर पालिका रुग्णालयांमध्ये देखील वैद्यकीय तपासणी करुन घेता येईल.

४. भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी त्या-त्या महसुली विभागासाठी नेमलेल्या रुग्णालयांतून प्रपत्र "ब"मध्ये दर्शविलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्यात व रुग्णालयाला वैद्यकीय चाचण्यांसाठी आवश्यक असलेली रक्कम प्रथम स्वत: अदा करावी व त्याची प्रतिपूर्ती आपल्या कार्यालयातून मिळवावी.

५. भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीतच संबंधित रुग्णालयाशी परस्पर संबंध साधून, तपासणीच्या तारखा निश्चित करुन घ्याव्यात व परस्पर प्रपत्र "ब" मधील सर्व वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्यात.

६. शासनाने वैद्यकीय तपासणीसाठी मान्य केलेल्या प्रपत्र "अ" मधील रुग्णालयांनी, भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीचा एकत्रित अहवाल, सोबतच्या प्रपत्र "ब" मध्ये, तपासण्या पूर्ण झाल्यानंतर आठ दिवसांच्या आत, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यासन-१) कडे सादर करावा तसेच त्याची एक प्रत संबंधित भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यालाही दयावी.

७. प्रपत्र "ब" मध्ये दर्शविलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या एकाच ठिकाणी व एकाच दिवशी करण्यात येतील. परंतु अपवादात्मक प्रकरणी काही कारणास्तव सर्व तपासण्या एका दिवसात करणे शक्य न झाल्यास, लगतच्या दुसऱ्या दिवशी त्या करुन घ्याव्यात. भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी आणि संबंधित रुग्णालये, यांनी तपासणीचा दिनांक व वेळ परस्पर ठरवून घ्यावी. तसेच तपासण्यांसाठीची पूर्वतयारी/आवश्यक खबरदारी सुध्दा (preperation) रुग्णालयाच्या सल्ल्याने घ्यावी.

८. वैद्यकीय तपासणीसाठीचा एक दिवस हा कालावधी कर्तव्यकाळ म्हणून समजण्यात येईल.सदर तपासण्या शासकीय सुट्टीच्या दिवशी केल्यास त्यासाठी कोणतीही रजा / बदली रजा अनुज्ञेय असणार नाही.

९. वैद्यकीय तपासण्यांचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी समजल्यामुळे भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी अन्यथा दौऱ्यावर असतांना, त्यांना ज्या दराने (लागू असल्यास) प्रवासभत्ता/ दैनंदिन भत्ता दिला जातो, त्याच दराने तो देय राहील. असा प्रवास भत्ता/ दैनिक भत्ता यांचे दर, वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित

केलेल्या आदेशानुसार देय राहील. याबाबतची परिगणना संबंधित वेतन प्रदान करणाऱ्या कार्यालयाने करुन त्यांचे प्रदान करावे.

१०. वैद्यकीय तपासणीस जाण्यापूर्वी अधिकाऱ्यांनी, त्यांच्या लगतच्या वरिष्ठांना ते सदर तपासणीसाठी मुख्यालयात अथवा मुख्यालयाबाहेरील हॉस्पिटलमध्ये जाणार असल्याबाबतची पूर्व कल्पना देणे आवश्यक राहील.

११. यावरील खर्च, संबंधित अधिकाऱ्याच्या आस्थापनेवरील वेतन व भत्त्यासाठी लागू असलेल्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या-त्या वर्षासाठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

१२. भापोसे अधिकारी कार्यरत असणाऱ्या महसूल विभागाशिवाय अन्य महसूल विभागातील रुग्णालयात वैद्यकीय तपासण्या करु इच्छित असल्यास, त्यांना इच्छित महसूल विभागातील प्राधिकृत केलेल्या रुग्णालयात अनुज्ञेय केलेल्या दरानुसार वैद्यकीय तपासण्या करुन घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.

२. अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील तरतूदीनुसार भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांनी या वैद्यकीय तपासण्या करुन घेणे आवश्यक असल्याने या प्रस्तावावर वित्त विभागाची दरवर्षी मान्यता घेण्याची आवश्यकता नसून यापुढे सामान्य प्रशासन विभागाने भाप्रसे अधिकाऱ्यांकरीता निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार गृह विभागाच्या स्तरावर या प्रस्तावास मान्यता द्यावी, असे निर्देश वित्त विभागाने या विषयाच्या २०१४-१५ च्या नस्ती क्र. आयपीएस-३०१५/प्र.क्र.३५/पोल-१ वर दिले आहेत. त्यास अनुसरुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८[illegible]३५१२४१२९६४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
Maharashtra, ou=Home Department,

( कैलास गायकवाड )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई /नागपूर
३. महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
६. महाराष्ट्र संवर्गातील भारतीय पोलीस सेवेतील सर्व अधिकारी (पोमसं यांचे मार्फत)
७. प्रपत्र-अ मधील सर्व खाजगी रुग्णालये
८. वित्त विभाग (सेवा-५),मंत्रालय,मुंबई.
९. निवड नस्ती

शासन निर्णय, क्रमांक- आयपीएस ३०१८/ प्र.क्र.७४ /पोल-१, दिनांक ३१ जानेवारी, २०१८ चे सहपत्र

**प्रपत्र "अ"**

| अ. क्र. | महसूली विभाग आणि त्याखालील जिल्हे | मा.पो.से. अधिकाऱ्यांची तपासणी करुन घेण्याकरिता निश्चित केलेल्या रुग्णालयाचे नाव, तपासणीचे दर, संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | **रुग्णालयाचे नाव** | **संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक** |
| १. | **मुंबई / कोकण विभाग**<br>मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग | **दि अपोलो क्लिनिक,**<br>कॅफे लिओपोल्ड समोर, बॅक ऑफ बडोदाच्या मागे, कुलाबा, मुंबई-४००००१ | डॉ. हिराल मनियार,<br>Hos. ०२२-२२०२११६६<br>Mob.८४५०९८२२२५ |
| | | **बॉम्बे हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर,**<br>१२, मरिन लाईन्स, मुंबई-४०००२०. | डॉ. नरसिंह रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक, G.M. Marketing,<br>दु.क्र.०२२-२२०१८८३२३, २२०६७६<br>भ्रमणध्वनी क्र.९८२०६२८२८०<br>Mail-narsim73@gmail.com |
| २. | **पुणे विभाग**<br>सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, सोलापूर | **रुबी हॉल क्लिनीक,**<br>४०, ससून रोड, पुणे-४११ ००१ | श्रीमती.हंसा कोटक<br>वरिष्ठ व्यवस्थापक,वैद्यकीय सेवा<br>Mob.- ९४२२३१०५०५<br>Hos. ०२० ६४९४९४९/ ६६४५५१००. |
| | | **आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पीटल,**<br>चिंचवड, पुणे-४११०३३. | श्री. सचिन सामेल<br>दु.क्र.०२०-३०७१७५००/ ४०७०७५००<br>भ्रमणध्वनी क्र.९८८११२३०३९,<br>mail-sachin.samel@adityabirla.com |
| ३. | **नागपूर विभाग**<br>नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, वर्धा | रुग्णालयाची निवड करण्याकरीता विभागीय आयुक्त, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. नागपूर विभागात कार्यरत असलेल्या भापोसे अधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त, नागपूर यांनी निश्चित केलेल्या खाजगी रुग्णालयांमधून रु. ५,४००/- च्या मर्यादेत सदर चाचण्या करुन घ्याव्यात. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | **नाशिक विभाग**<br>नाशिक, धुळे,<br>जळगांव, नंदुरबार,<br>अहमदनगर | **सुयश मेडीकल फाऊंडेशन प्रा. लि., सुयश हॉस्पिटल,**<br>अहिल्याबाई होळकर मार्ग, महामार्ग बस स्टँड शेजारी, मुंबई नाका, नाशिक. | डॉ.हेमंत ओस्तवाल,<br>व्यवस्थापकीय संचालक<br>Mob.-९४२२२५८७७७<br>Hos.-०२५३-२३१८९९०/९१/९३ |
| ५. | **औरंगाबाद विभाग**<br>औरंगाबाद, बीड,<br>जालना, परभणी,<br>नांदेड, हिंगोली,<br>लातूर, उस्मानाबाद | **डॉ.हेगडेवार रुग्णालय,**<br>गजानन महाराज मंदिराशेजारी,<br>गारखेडा परिसर,<br>औरंगाबाद-४३४००३ | श्री. दौलत लोखंडे, रुग्णालय प्रशासक<br>Mob.-९८२२५६१४५३<br>Hos.-०२४०-२३३११९५<br>Email ID-<br>mgmmcri@gmail.com |
| ६. | **अमरावती विभाग**<br>अमरावती, यवतमाळ,<br>अकोला, बुलढाणा,<br>वाशिम | अमरावती विभागात कार्यरत असलेल्या भापोसे अधिका-यांनी त्यांना जवळ असलेल्या इतर महसूली विभागातील रुग्णालयातून सदर वैद्यकिय चाचण्या करुन घ्याव्यात. | |

प्रपत्र "ब"

**Form IV**
[See Rule 3]

Performa for Executive Health Check up

**Date:**

**Name:** ________________ **Age:** _________ **Sex: M/F**

**Brief Clinical History, if any:**

A. **Investigations Reports**

| Sr. No. | Test | Actual Count | Normal Range | Remarks (if any) |
|---|---|---|---|---|
| 1. | **a) Haemogram** | | | |
| | (i) Haemoglobin | | | |
| | (ii) TLC (Total Leukocyte Count) | | | |
| | (iii) DLC (Differential Leukocyte count)<br>(a) Polymorphs<br>(b) Lymphocytes<br>(c) Eosinophils<br>(d) Basophils<br>(e) Monocytes<br>(iv) Peripheral Smear | | | |
| | (b) Thyroide Profile<br>(i) T3<br>(ii) T4<br>(iii) TSH | | | |
| | (c) Vit.B12 test | | | |
| | (d) Vit D3 test | | | |
| 2. | **Urine Examination** | | | |
| | (i) Colour<br>(ii) Albumin | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (iii) Sugar<br>(iv) Microscopic Exam | | | |
| | **Stool routine** | | | |
| | (i) Ova, cyst<br>(ii) Occult blood | | | |
| **3.** | **Blood Sugar**<br>(i) Fasting<br>(ii) Post-Prandial<br>(iii) HbA1C<br>(iv) Insulin (Fasting) | | | |
| **4.** | **Lipid Profile**<br>(i) Total Cholesterol<br>(ii) HDL Cholesterol (High Density Lopoprotein Cholesterol)<br>(iii) LDL Cholesterol (Low Density Lopoprotein Cholesterol)<br>(iv) VLDL Cholesterol (Very Low Density Lopoprotein Cholesterol)<br>(v) Triglycerides | | | |
| **5.** | **Liver Function Tests**<br>(i) S. Bilirubin (Total) (Serum Bilirubin)<br>(ii) S. Bilirubin (Direct) (Serum Bilirubin)<br>(iii) S.G.O.T. (Serum Glutamic Onaloacetic Transaminase)<br>(iv) S.G.P.T. (Serum Glutamic Pyruvic Transaminase)<br>(v) Australia Antigen Test (Hepatitis B)<br>(vi) Serum Total Protines<br>Albumin, Globilin, A/G ratio<br>(vii) Prothrombin time (P.T) INR | | | |
| **6.** | **Kidney Function Tests**<br>(i) Blood Urea<br>(ii) S. Creatinine (Serum Creatinine)<br>(iii) S. Uric Acid (Serum Uric Acid)<br>(iv)Na+ (Sodium)<br>(v) K (Potassium)<br>(vi) Calcium | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (vii) Inorganic Phosphorus | | | |
| 7.<br>(A)<br><br><br><br>(B) | **Cancer screening**<br>For Men<br>(i) PSA (Prostate Specific Antigen Test)<br>(ii) LDH(Lactic Acid Dehydrogenase test)<br>For Women<br>(vi) PAP SMEAR (Papanicolaou test) | | | |
| **8.** | **X-Ray-Chest PA View Report** | | | |
| **9.** | **ECG Report** (Electro Cardiogram Report) | | | |
| **10.** | **USG Abdomen with pelvis (Ultrasonography Abdomen with pelvis Report)** | | | |
| **11.** | **TMT Report (Treadmill test)/Stress test** | | | |
| **12.** | **Mammography Report (Women)** | | | |
| **13.** | **Gynaecological Health Check Up**<br>(i) Pelvic Examination<br>(a) Local Examination<br>(b) Per Vaginum (PN)<br>(c) Per Speculum<br>(ii) Surgical Examination<br>(iii) Breast Examination | | | |
| **14.** | **(i) Urological Examination (For Men Only)**<br>**(ii) Rectal Examination (For Men Only)** | | | |
| **15.** | **Systemic Examination**<br>(i) Resp System (Respiratory System)<br>PFT (Pulmonary Function Test)<br>(ii) CVS (Cardiovascular System)<br>(iii) Abdomen<br>(iv) CNS (Central Nervous System)<br>(v) Locomotor System<br>(vi) Dental Examination | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16. | **Eye Examination**<br>(i) Distant Vision<br>(ii) Vision with Glasses<br>(iii) Colour Vision<br>(iv) Tonometry<br>(v) Fundus Examination | | | |
| 17. | **ENT**<br>(i) Oral Cavity<br>(ii) Nose<br>(iii) Throat & Neck<br>(iv) Larynx | | | |

A. **Medical Report of the Officer-**

| | | |
|---|---|---|
| **1.** | Hemoglobin level of the officer | Normal/Low |
| **2.** | Blood Sugar Level /HbA1C Level | Satisfactory/Normal/High/Low |
| **3.** | Cholesterol level of the officer | Normal/High/Low |
| **4.** | Liver functioning | Satisfactory/Normal/ dysfunctioning |
| **5.** | Kidney Status | Normal/Both-one kidney not functional optimally |
| **6.** | Cardiac Status | Normal/enlarged/blocked/not normal |
| **7.** | BMI (Body Mass Index) | Normal/High |

**B. Summary of Medical Report (only copy of this part is to be attached to PAR)**

| | | |
|---|---|---|
| **1.** | Overall Health of the Officer | |
| **2.** | Any other remarks based on the health medical check up of the officer | |
| **3.** | Health profile grading | Excellent/ Very Good/Good/Average |

Date:

Signature of Medical Authority
Designation: